महाराष्ट्र शासन -कृषि विभाग
नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प
३०, आर्केड, वर्ल्ड ट्रेड सेंटर, कफ परेड, मुंबई- ४०० ००५.
दूरध्वनी क्र.०२२- २२१६३३५१ email: mahapocra@gmail.com

जा. क्र. नादेकृसंप्र-०३२५/प्रशिक्षण/प्रक-५७/२०२४-२५ / 23L दिनांक १७.०३.२०२५

प्रति,

मा. प्रधान सचिव (कृषि)

**विषय:- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत ग्राम कृषि विकास समिती सदस्य आणि ग्राम कृषि विकास समिती मार्फत प्रकल्प गावांमध्ये निवडण्यात आलेले स्वयंसेवक यांचे एकदिवसीय प्रशिक्षणाकरिता मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री (कृषि) यांचे ध्वनीमुद्रित दूरचित्रवाणी संदेश (Video Recorded) संदेश प्राप्त होणे बाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपणास विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प टप्पा-२ अंतर्गत निवडलेल्या गावांचे ग्राम कृषि विकास समिती सदस्य यांना प्रकल्पाबाबत परिचय व्हावा तसेच प्रकल्प अंमलबजावणी बजावणीबाबत मार्गदर्शन व्हावे या उद्देशाने सदर सदस्यांकरिता दि. २ एप्रिल २०२५, रोजी बुधवारी, सकाळी १०.३० वाजता प्रकल्प गावांतील सर्व ग्रामपंचायत स्तरावर एक दिवसीय प्रशिक्षण नियोजित आहे. तसेच, प्रकल्पाचे प्रत्येक गावामधून स्वयंसेवकांची निवड करण्याची कार्यवाही क्षेत्रीय पातळीवर सुरु असून सदर स्वयंसेवकांना देखील त्याच दिवशी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. नियोजित एकदिवसीय प्रकल्प ओळख प्रशिक्षणामध्ये दूरस्थ पद्धतीने (प्रकल्पाचे युट्यूब चॅनेल द्वारे) तसेच प्रत्यक्ष विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांचेमार्फत देण्यात येणार आहे. सदर प्रशिक्षणामध्ये मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री (कृषि) यांचे ध्वनीमुद्रित दूरचित्रवाणी संदेश (Video Recorded) संदेश प्रसारित करून उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना मार्गदर्शन करण्याचे नियोजित आहे.

तरी, नियोजित प्रशिक्षणामध्ये मा. मुख्यमंत्री व मा. मंत्री (कृषि) यांचे ध्वनीमुद्रित दूरचित्रवाणी संदेश (Video Recorded) संदेश प्राप्त व्हावे, ही विनंती. सदर प्रशिक्षणामध्ये उपस्थित ग्राम कृषि विकास समिती सदस्यांना संबोधन करण्यासाठी सोबत मसुदा देण्यात येत आहे.

*सोबत- वरीलप्रमाणे*

Parimal 17/3

**परिमल सिंह**
**प्रकल्प संचालक**
**नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प, मुंबई**

# मा. मुख्यमंत्री यांचे सरपंच आणि ग्राम कृषी विकास समिती सदस्यांना संबोधन

## नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा २

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यातील गावांचे सरपंच आणि ग्रामपंचायतीच्या सदस्यांचे प्रथम अभिनंदन ! महाराष्ट्रातील शेतीचे मुलभूत प्रश्न सोडविण्याकरिता कटिबद्ध असलेले आपले सरकार राज्यातील शेतीसाठी अनेक योजना राबवीत आहे. शेतीसाठी जास्तीत जास्त पाणी उपलब्ध करण्यासाठी गेल्या दहा वर्षात जलयुक्त शिवारसारखे राज्यव्यापी उपक्रम हाती घेतले असून त्याचा फायदा हजारो गावातील लाखो शेतकऱ्यांना होताना दिसत आहे. त्याचबरोबर बदलत्या हवामानाला तोंड देत शेती आणखी कशी किफायतशीर करायची ह्यासाठी आम्ही जागतिक बँकेच्या सहकार्याने भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या कार्याने प्रेरित होवून सर्वांगीण शेती विकासाचा नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सुरु केला आहे. मराठवाडा आणि विदर्भातील हवामानाला संवेदनशील असलेल्या ५२२० गावांमध्ये २०१८ ते २०२४ या काळात या प्रकल्पाचा पहिला टप्पा राबविण्यात आला आणि त्याचा फायदा लाखो शेतकरी कुटुंबांना झाल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. आपणास सांगताना आनंद होतोय की ही अशी कृषी विकासाची योजना आहे की ज्याची मागणी योजनेबाहेरील हजारो गावांनी लोकप्रतिनिधींच्या मार्फत शासनाकडे केली होती. आणि शेतकऱ्यांच्या मागणीचा अगदी आदरपूर्वक आणि जाणीवपूर्वक विचार करून आमच्या शासनाने पुन्हा जागतिक बँकेकडे आणि केंद्र शासनाकडे विनंती केली. त्यांनी ती तत्वतः मान्य केली आणि आम्ही नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचा दुसर टप्पा राबविण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी गेल्या वर्षी ऑक्टोबर मध्ये आपण या प्रकल्पात ७२०१ गावांचा समावेश करणारा निर्णय घेतला आहे आणि आपण सर्वजण त्या गावांचे प्रतिनिधी म्हणून आता हा प्रकल्प नेटाने राबविणार आहात. प्रत्येक ग्राम पंचायतीमध्ये स्थापित केलेल्या सरपंचाचे अध्यक्षतेखालील ग्राम कृषी विकास समितीने आता जोमाने काम करण्याची गरज आहे. याबरोबरच आपण या टप्प्यात गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर तसेच नाशिक जिल्ह्यातील आदिवासी बहुल गावांचा समावेश केला असून तेथील आदिवासी शेतकरी बांधव शेतीक्षेत्रातील नवनवीन

ज्ञानापासून वंचित राहणार नाहीत याचीही काळजी घ्यावी लागेल. या भागातील पेसा क्षेत्रातील ग्रामसभांनी या प्रकल्पाच्या सहाय्याने शेतीसाठी लागणाऱ्या सुविधा निर्माण करण्याची संधी घेतली पाहिजे.

सध्या शेतीला भेडसावणाऱ्या अनेक समस्यांमध्ये बदलत्या हवामानाचे शेती क्षेत्रावर होणारे दुष्परिणाम ही मोठी समस्या होऊन बसली आहे. आपल्या राज्यातील बहुतांशी शेती ही पावसाच्या पाण्यावर अवलंबून असल्याने पावसाचे आगमन , प्रमाण आणि निर्गमन हे सारे शेतीच्या उत्पादकतेवर परिणाम करतात. कधी उशिरा येणारा पाऊस, मध्येच पडणारा मोठा खंड, अचानक कोसळणारा पाऊस, लवकरच जाणार पाऊस ह्या लहरीपणामुळे शेतकऱ्यांना पिकांचे नियोजन करणे अवघड होवून बसत आहे. चांगला पाऊस पडूनही भूगर्भातील पाण्याची पातळी खलावत चालली आहे आणि याचा फटका राज्यातील रबी व उन्हाळी हंगामातील क्षेत्रावर होत आहे. पावसाच्या लहरीपणाबरोबरच वाढते तापमान आणि वारंवार केली जाणारी मातीची हलवाहलव ही सुपीक जमिनीची धूप होण्यास कारणीभूत होत आहे. परिणामी जमिनीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाणदेखील कमी होत चालले असून जेथे किमान १% सेंद्रिय कर्ब पाहिजे तेथे तो आता ०.५% च्या आसपास खाली आलेला आहे. साहजिकच आहे की कितीही रासायनिक खते घातली तरी सेंद्रिय कर्बाच्या कमतरतेमुळे पिकांची उत्पादकता कमी होताना दिसत आहे. म्हणून शेतीच्या पाण्याचा आणि जमिनीच्या अरोग्याचा प्रश्न मुलभूत मानून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या ह्या टप्प्यात काम करण्यात येणार आहे. माती आणि पाण्याच्या संवर्धनासाठी मोठ्या प्रमाणात मृद व जलसंधारण कामे हाती घेण्यात येणार आहेत, पण आमची अपेक्षा आहे की जलसंधारणासाठी गावातील युवक युवतींनी मोठी चळवळ उभी केली पाहिजे. कारण दरवर्षी पडणाऱ्या पावसाचे नदीला वाहून जाणारे पाणी आपण अडवले नाही तर कायमच आपण कोरडवाहू राहू आणि परिणामी शेती व्यवसाय आतबट्ट्याचा होवून बसेल.

हवामान बदलास सामोरे जाण्यासाठी जे जे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांना अवगत करण्याची आवश्यकता आहे, ते ह्या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यात येत आहे. पाण्याचा साठा करण्यासाठी शेततळे असो, पाण्याच्या कार्यक्षम वापरासठी ठिबक-तुषार सिंचन पद्धतींचा अवलंब असो, फळझाडांची लागवड असो किंवा बदलत्या हवामानात तग धरणाऱ्या बियाण्यांचे उत्पादन असो, शेतकरीबांधव सरकारच्या या प्रयत्नास चांगलाच प्रतिसाद देतील अशी अपेक्षा आहे. याबरोबरच शेतीमधील खर्च कमी करण्यासाठी संवर्धित शेती आणि नैसर्गिक शेती पद्धतींचा अवलंब करण्यावर भर देण्यात येणार आहे. तुमच्या सर्व गावांत ह्या तंत्रज्ञानाचा वापर जरूर करावा. मराठवाड्यासारख्या टंचाईग्रस्त भागात प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात प्रोत्साहन दिलेल्या रेशीम उद्योगास आमच्या महिला भगिनींनी दिलेला प्रतिसाद वाखाणण्याजोगा असून परिणामी जालना आणि बीड येथे रेशीम कोषाची खरेदी मोठ्या प्रमाणावर सुरु झालेली आहे. अशाच प्रकारे ह्या टप्प्यातदेखील आपण शेतीवर आधारित अनेक प्रकारच्या लहान मोठ्या व्यवसायांना आर्थिक सहाय्य देणार असून त्याचा लाभ हजारो महिला बचत गटांना आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना होणार आहे. त्यामुळे गावातच रोजगार निर्मिती होवून गावे आत्मनिर्भर बनण्यास हातभार लागेल.

आपले राज्य हे शेती क्षेत्रामध्ये सुधारणा करण्यासाठी कायमच अग्रेसर राहिले आहे आणि त्याची दखल देशपातळीवर नेहमीच घेण्यात आलेली आहे. नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या अंमलबजावणी रचनेतच आपण शेतकऱ्यांना विविध अनुदान देण्यासाठी राज्यातील पहिली डीबीटी कार्यप्रणाली सुरु केली आणि अल्पावधीतच ही कार्यप्रणाली लोकप्रिय झाल्याने कृषी विभागाच्या सर्वच योजनांचा लाभ राज्यातील सर्व गावांमध्ये महाडीबीटी द्वारे देण्यास सुरुवात केली आहे. डिजिटल शेतीकडे वळण्याचा हा प्रयत्न राज्यातील कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यांनीदेखील स्वीकारला आहे. प्रकल्पाच्या ह्या टप्प्यात राज्यातील सर्व गावातील शेतकऱ्यांना AI सारख्या आधुनिक तंत्रांचा वापर करून हवामान आणि शेतीविषयक सल्ला देण्याचे सरकारचे धोरण आहे. ह्या प्रकल्पाच्या माध्यमातून

अशा आधुनिक डिजिटल तंत्रांचे विकसन करून अद्यायवत सेवा देण्यास प्रकल्प आणि कृषी विभाग लवकरच आपल्या सेवेत हजर राहील.

हे सगळ शक्य तेंव्हा होणार आहे, जेव्हा आपल्या गावाची ग्राम कृषी विकास समिती नेहमीच क्रियाशील राहिल. तेंव्हा आजपासूनच आपल्या गावाचा पुढील ६ वर्षाचा आरखडा तयार करण्याच्या कामाला लागावे. आपल्या गावाचे सूक्ष्म नियोजन करण्यासाठी कृषी विभागाचे सर्व अधिकारी आणि क्षेत्रीय पातळीवरील कृषी सहाय्यक आपल्याला मदत करतील, तरी आपण पुढाकार घेवून प्रत्येक गावामध्ये शिवार फेरी करून गावनिहाय शाश्वत विकास आराखडा लवकरच तयार करावा, असे मी सर्वांना आवाहन करत आहे. धन्यवाद. जय महाराष्ट्र !!